# <u>प्रेसनोट</u> दि. १०/०२/२०२५

**ॲन्टी करप्शनच्या पुणे घटकाकडून उपविभागीय अधिकारी कार्यालय, पुणे शहर – शिरुर कार्यालयातील अव्वल कारकुन व खाजगी इसम यांना लाच मागणी व लाच स्विकारले प्रकरणी ताब्यात घेतलेबाबत.**

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
| पोलीस स्टेशन व गुन्हा नोंद क्रमांक | बंडगार्डन पोलीस स्टेशन, पुणे शहर. |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, सन १९८८ चे कलमान्वये. |
| तक्रारदार | पुरुष, वय ३९ वर्ष |
| आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय | १) श्रीमती. सुजाता मनोहद बडदे, पद - अव्वल कारकून, उपविभागीय कार्यालय, पुणे शहर – शिरुर (वर्ग-३)<br>२) तानाजी श्रीपती मारणे, वय ४६ वर्ष, रा. इंदिरानगर, अप्पर सुपद बिबवेवाडी, पुणे. (खाजगी इसम) |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | ४,००,०००/- (चार लाख) रुपये |
| पडताळणी दरम्यान लाच मागणी रक्कम | ३,२०,०००/- (तीन लाख वीस हजार) रुपये |
| स्वीकारलेली लाच रक्कम | १,६०,०००/- (एक लाख साठ हजार) रुपये |
| पडताळणी दिनांक | ०७/०२/२०२५ |
| सापळा दिनांक | १०/०२/२०२५ रोजी |
| ठिकाण | उपविभागीय कार्यालय, पुणे शहर – शिरुर. |
| तपास अधिकारी यांचे नाव व पद | श्री. अमोल भोसले, पोलीस निरीक्षक, लाप्रवि, पुणे (मो.क्र. ९५२७३१७५२७) |

थोडक्यात माहिती :- यातील तक्रारदार यांची टेमघर धरणामध्ये जमीन संपादन झाल्यामुळे त्यांना महाराष्ट्र सरकारकडून विठ्ठलवाडी, ता. शिरुर, जि. पुणे येथे शेतजमीन व घरासाठी दोन गुठ्यांचा भुखंड दिला गेला आहे. तक्रारदाराच्या घरातील चार संदस्यासाठी व त्यांचा सख्ख्या भावाच्या घरातील सदस्यासाठी चार असे एकूण आठ जणांचे आठ प्रस्ताव आरोपी लोकसेवक सुजाता बडदे यांचेकडे प्रलंबित होते. सदर घराचे भुखंड मंजुर होणेकामी ते आठ प्रस्ताव उपविभागीय अधिकारी शिरुर यांच्या समक्ष ठेवून त्यांच्याकडून ते मंजूर करुन देण्यासाठी लोकसेवक सुजाता बडदे यांनी तक्रारदाराकडे प्रत्येक प्रस्तावासाठी सुरुवातीला ५०,००० रुपये असे आठ प्रस्तावासाठी एकुण ४,००,००० रुपयाच्या लाचेची मागणी केल्याबाबतची तक्रार दि. ४/०२/२०२५ रोजी तक्रारदार यांनी ला.प्र.वि. पुणे येथे दिली होती.

प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने दि. ०७/०२/२०२५ रोजी लोकसेवक सुजाता बडदे यांची उपविभागीय अधिकारी शिरुर कार्यालयात पंचासमक्ष पडताळणी केली असता, लोकसेवक सुजाता बडदे यांनी तक्रारदारांकडे पुनर्वसनाच्या जागेचे आठ प्रस्ताव तयार करुन ते उपविभागीय अधिकारी शिरुर यांच्या समोर ठवून त्यांच्याकडून मंजूर करुन घेण्यासाठी, तक्रारदाराच्या प्रत्येक प्रस्तावासाठी ४०,००० रुपये असे आठ प्रस्तावासाठी ३,२०,००० रुपयाची मागणी करुन, ती लाच रक्कम खाजगी इसम तानाजी मारणे यांच्याकडे देण्यास सांगितल्याचे निष्पन्न झाले. आज दि. १०/०२/२०२५ रोजी केलेल्या सापळा कारवाई दरम्यान लोकसेवक सुजाता बडदे यांनी मागितलेल्या लाच रक्कमेपैकी पहिला हप्ता म्हणून तक्रारदाराकडून १,६०,००० रुपयाची लाच रक्कम लोकसेवक सुजाता बडदे यांचे सांगणेवरुन खाजगी इसम तानाजी मारणे याने पंचांसमक्ष स्विकारताना त्यास रंगेहात पकडण्यात आले आहे. त्यानंतर लोकसेवक सुजाता बडदे यांनाही ताब्यात घेण्यात आले आहे.

त्या दोघांविरुद्ध बंडगार्डन पोलीस स्टेशन, पुणे शहर येथे भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, सन १९८८ चे कलमान्वये अन्वये गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

सदरची कारवाई पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. शिरीष सरदेशपांडे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, पुणे व अपर पोलीस अधीक्षक डॉ. शीतल जानवे, ला.प्र.वि. पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

लोकसेवक शासकीय अधिकारी / कर्मचारी किंवा त्यांच्यावतीने खाजगी इसम (एजंट) हे कोणतेही शासकीय काम करून देण्यासाठी कायदेशीर फी व्यतिरिक्त अन्य लाचेची मागणी करीत असल्यास त्याबाबत तात्काळ लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमूद क्रमांकवर सपंर्क साधण्याचे आवाहन श्री. शिरीष सरदेशपांडे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. पुणे यांनी केले आहे.

१) ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे - दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
२) व्हॉट्स-ॲप क्रमांक मुंबई - ९९३०९९७७००
३) ई-मेलआयडी - पुणे dyspacbpune@mahapolice.gov.in
४) वेबसाईट - www.acbmaharashtra.gov.in
५) ऑनलाईन ॲप तक्रार - www.acbmaharashtra.net.in

10/2/25

(दयानंद गावडे)
सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उप-अधीक्षक, (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे.

सहायक पो. आयुक्त/पोलीस उप-अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो
सत्यमेव जयते